# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक २ चे इतिवृत्त

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **गुरूवार दिनांक २२/०२/२०२४ सकाळी ११-०० वाजता स्व.अटलबिहारी वाजपेयी मुख्य सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. त्या बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करूणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ४. | श्री.हेमंत निकम | उपायुक्त |
| ५. | श्री.गजानन पाटील | मुख्य लेखाधिकारी |
| ६. | श्री.सुनिलकुमार सुर्यवंशी | प्र. मुख्य लेखा परिक्षक |
| ७. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ८. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| ९. | श्री.कैलास शिंदे | अभियंता |
| १०. | श्री. पी.डी. चव्हाण | सहाय्यक अभियंता |
| ११. | श्री. एन. के. बागुल | विद्युत अभियंता |
| १२. | श्री.सी. एम. उगले | सहा.अभियंता,पा.पु.वि. |
| १३. | श्री. प्रकाश सोनवणे | कनिष्ठ अभि. नगररचना विभाग |
| १४. | डॉ. एम.आर.शेख | आरोग्याधिकारी |
| १५. | श्री.राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १६. | श्री. किशोर सुडके | परवाना विभाग / बाजार विभाग |
| १७. | श्री.चंद्रकांत मोरे | प्र.लेखापाल |
| १८. | श्री.प्रकाश पवार | लिपीक,आस्थापना विभाग |
| १९. | श्री.राजेंद्र माईनकर | प्र.भांडारपाल |
| २०. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २१. | श्री.चंद्रकांत जाधव | मलेरिया पर्यवेक्षक |
| २२. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २३. | श्री.राजेश गायकवाड | लेखापाल,शिक्षण मंडळ |

| | | |
|---|---|---|
| २४. | श्री.संभाजी सुडके | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २५. | श्री.अतुल पाटील | लिडींग फायरमन |
| २६. | श्री.मधुकर निकुंभे | अधिक्षक, मालमत्ता कर विभाग |
| २७. | श्री.हेमंत पावटे | कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग |
| २८. | श्री.बासित पठाण | सिस्टीम मॅनेजर,संगणक विभाग |
| २९. | श्रीमती मिना सातभाई | महिला व बालकल्याण विभाग |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-०७ मागील महासभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (सभा क्र.२७ दि.१९/१२/२०२३ व प्रशासकीय महासभा क्र.०१ दिनांक २५/०१/२०२४)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.अभियंता मागील महासभेचे इतिवृत्त कायम करण्यात यावे.

म.अति.आयुक्त इतिवृत्त वाचून कायम करण्यात यावे.

मा.प्रशासक मागील महासभा क्र.२७ दि.१९/१२/२०२३ चे व प्रशासकीय महासभा क्र.१ दिनांक २५/०१/२०२४ चे इतिवृत्त वाचून कायम करण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक ०७ दिनांक २२/२/२०२४**

मागील महासभा क्रमांक २७ दिनांक १९/१२/२०२३ च्या सभेतील धुळे मनपा ठराव ३२३ ते ३५६ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच प्रशासकीय महासभा क्रमांक १ दिनांक २५/०१/२०२४ च्या सभेतील धुळे मनपा प्रशासक ठराव क्रमांक १ ते ६ अखेर क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-०८ धुळे महानगरपालिकेचे देवपुर पांझरा नदी किनारी येथील संत रविदास उदयान वार्षीक भाडेतत्वावर करार पध्दतीने चालविण्यासाठी देणेकामी धोरण निश्चिती करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शाखा अभियंता पांझरा नदी किनारी संत रविदा उद्यान भाडे तत्वावर देणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम च्या कलम ७९ च्या नियम क नुसार मा. आयुक्त यांना मनपाच्या मंजूरीने मनपाची कोणतेही स्थान किंवा जंगम मालमत्ता पट्टयाने देता येईल, विकता येईल, भाडयाने देता येईल असे नमूद आहे. त्यासाठी महासभेचा ठराव आवश्यक आहे. त्या कारणाने हा विषय महासभेपुढे आलेला आहे. पांझरा नदी किनारचे उद्यान भाडयाने देण्यासाठी मक्तेदाराकडून देयकार मागवणार आहे. यामध्ये मुख्य अटी शर्ती प्रस्तावित केलेल्या आहे. याबाबत अंदाजपत्रक केले होते. मक्तेदाराने प्रवेश शुल्क ५ रुपये आकारले त्याला साधारणत: ५०० लोकांचा उद्यान प्रवेश होईल. त्याप्रमाणे २५००/- रु उत्पन्न प्रति दिवस अपेक्षित धरले आहे. लेझर शो साठी ३० रु टिकीट असणार आहे. याप्रमाणे ३० लाख ६० हजार रुपये प्रतिवर्ष अंदाज धरला आहे. त्याच्या २५% रक्कम रॉयल्टी बेसिसवर त्याने मनपा ला द्यायची आहे. ७ लाख ६५ हजार मात्र उत्पन्न अपेक्षित आहे. यामध्ये मक्तेदाराने मनपाला सुरक्षा रक्कम देणे

आवश्यक आहे. जर मनपा मालमत्तेचे नुकसान झाले तर ते त्यातून वसुल करता येईल. या बोलीवर मक्तेदाराने निविदा भरावी असा प्रस्ताव केला आहे. यात १ वर्षासाठी अंदाजपत्रक केले आहे.

मा.प्रशासक — यात २-३ गोष्टी आहे. यात महिनाभर तुम्ही ट्राय करुन बघा. कारण संभाजी महाराजांचा पुतळा आहे तेथील गार्डन असे चालवण्यास दिले होते. आज त्या गार्डनची अवस्था पाहिली तर वाईट वाटते. इतकी मोटी यंत्रणा लावली व लेझर शोसाठी मोठी रक्कम टाकली गार्डनच्या डेव्हलपमेंटसाठी मोठा खर्च आला आहे. तेथे असे कोणाला तरी लोकल मक्तेदाराला देऊन चालणार नाही. तेथे प्रॉपर माणसे असली पाहिजे. त्यात अशा स्वरुपाचे काम आहे. असे अटी शर्तीत नमूद करावे लागेल. आणि १५ ते २० दिवस पर्सनली हे स्वत: करुन पहावे. साधारण काय खर्च आहे यात लाईट बिलचा विषय आहे. मॅनपॉवर आणि बरेच विषय आहे. या हिशोबाने वास्तविक इस्टीमेट करा. असे माझे म्हणने आहे. आणि मग निविदा प्रक्रीया करावी असे सांगणे आहे. तेथे काही गैरप्रकार घडणार नाही. हे बघणे आपल्याच यंत्रणेचे काम राहील. हे सगळे वर्कआऊट केल्यानंतरच टेंडर प्रोसेस करावी.

म.अभियंता — साधारणत: १ लाख रुपये सुरक्षेसाठी खर्च लागेल व लाईट बिल साधारणत: ५० हजारापर्यंत येईल. नंतर ते कलामंदीर सारखे होऊन जाईल. अशा स्वरुपाचे प्रकल्प ज्यांनी चालवले असतील अशाच संस्थेने यात सहभागी होता येईल अशी अट टाकली तर ते होऊ शकेल.

मा.प्रशासक — व्यवस्थीत टेंडर कंडीशन कराव्या. अंदाज घ्या हया सर्वांना साधारण खर्च किती राहिल आपण फक्त उत्पन्नाच्या बाजू पाहतोय. दररोज ५०० लोक तेथे येणार नाही. फक्त शनीवारी , रविवारी गर्दी होणार आहे. याबाबत वास्तविक सर्व्हे करा मग प्रोसेस करा. या सर्व अटी टाकून सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक ०८ दिनांक २२/२/२०२४**

सदरच्या उदयानामध्ये नागरीकांच्या मनोरंजनासाठी फाऊन्टेन तसेच लेझर शो बसविण्यात आलेला आहे. सदरील उदयान नागरीकांसाठी विनाशुल्क आहे. सदरील उदयानाचे क्षेत्रफळ सुमारे ५ एकर असुन या उदयानामध्ये मोठया प्रमाणामध्ये वृक्ष संवर्धन, लॉन तसेच जॉगीग ट्रॅक इत्यादी उपलब्ध आहे. या उदयानाच्या देखभालीसाठी कर्मचारी नाही तथा सुरक्षेसाठी तात्पुरता स्वरूपात सुरक्षा रक्षक ठेवण्यात आले आहे. तसेच उदयानाची दैनंदिन स्वच्छता साफसफाई व अन्य बाबीची देखरेख होणे गरजेचे आहे.

उक्त बाब लक्षात घेता सदर उदयाने संपुर्णपणे ठेव तत्वावर मक्तेदारास एक रक्कमी रॉयल्टी बेसेसवर देणेसाठी प्रस्तावीत करण्यात आलेले आहे. या प्रस्तावानुसार मक्तेदाराची मनपाच्या अटी व शर्तीनुसार जबाबदारी निश्चित होईल.

देवपुर पांझरा नदी किनारी संत रविदास उदयान वार्षीक भाडेतत्वावर करार पध्दतीने प्रस्तावित केलेल्या देकार रक्कमेनुसार व अटी शर्तीनुसार किमान २ वर्ष कालावधीसाठी निविदा प्रसिध्द करणेस सदर प्रस्तावास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

सदर उद्यान अद्यायावत स्वरूपाचे असल्याने त्याठिकाणी अनुभवी अभिकर्त्यांची नियुक्ती होण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या अटी शर्तीचा समावेश निविदेत करावा तसेच सुरक्षा रक्कम निश्चित करावी. तसेच निविदा प्रसिध्दीपुर्वी उद्यान्यातील अपेक्षित उत्पन्न व खर्च याबाबत पुनश:च आढावा घेवून पडताळणी करावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-०९ मौजे देवपूर धुळे येथील सर्व्हे क्र.३५/१/ब सिटी सर्व्हे क्र.८४९४ क्षेत्र ४०६० चौ.मी.जागेवर पुर्वीचे आरक्षण कायम ठेवून नव्याने भूसंपादन प्रस्ताव सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कनिष्ठ अभियंता मौजे देवपूर सं. न. ३५ जेल रोड अतिक्रमण धारकांसाठी भूसंपादन प्रक्रीया करण्यात आली होती. या जागेचा अंतिम निवाडा २०१३ ला झाला तथापि अतिक्रमण धारकांनी पत्र दिले कलेक्टर साहेबांना त्यानंतर भूसंपादन अधिकाऱ्यांनी सदर जागा मनपास आवश्यक आहे किंवा कसे विचारणा केली असता मनपा ठराव क्र. २०८ दि. २९.३.२०२३ अन्वये मनपा नावावर मंजूरी दिली आहे. परंतु निवाडा २००३ साली झाला असल्याने त्यावरील १० वर्षाचे व्याज १०% प्रमाणे जास्तीची रक्कम येत असल्याने अंतिम निवाडा रद्द करुन सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत सदरचा विषय महासभे समोर सादर करण्यात आला आहे.

मा.प्रशासक हे ठीक आहे आणखी कुठलया कारणास्तव हा प्रस्ताव येथे आला आहे.

म.कनिष्ठ अभियंता मूळ मालकाने २० कोटी रकमेची मागणी केली व्याजासहित आणि तो प्रस्ताव २००२ नुसार होता. सुधारित भूसंपादन कायदा २०१३ नुसार नव्याने भुसंपादन प्रस्ताव सादर केला आहे.

मा.प्रशासक भूसंपादन अधिकाऱ्यांचे पत्र आहे त्यात म्हटले आहे तुम्हाला जागेची गरज आहे किंवा कसे? तर हे पण ठरावामध्ये आले पाहिजे तर मार्केट च्या आरक्षणासाठी लागणार आहे. आपल्याला त्यामुळे २०१३ च्या निवाडयाप्रमाणे भूसंपादित करुन द्या असा प्रस्ताव द्यायचा आहे. २०१३ च्या कायद्याखाली नव्याने प्रस्ताव सादर करायचा आहे. त्यानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक ०९ दिनांक २२/०२/२०२४**

मौजे देवपूर धुळे येथील सर्व्हे क्र.३५/१/ब सिटी सर्व्हे क्र.८४९४ क्षेत्र ४०६० चौ.मी.जागेवर भुसंपादन प्रस्ताव हा मे.महासभेसमोर धोरणात्मक निर्णयासाठी सादर केला असता शहरातील व्यावसाईक व बेरोजगारी समस्या लक्षांत घेता म. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत झालेला निवाडा रद्द न करता निवाडा मनपाच्या नावे करण्याबाबत प्रस्ताव सादर करावा व सदर आरक्षण पुर्ववत ठेवण्यात यावे. सदर जागा भुसंपादनाची कार्यवाही मनपाने करावी तसा प्रस्ताव म.जिल्हाधिकारी यांच्याकडेस सादर करणेबाबत यापुर्वी महानगरपालिका ठराव क्र.208 दिनांक 29/03/2023 अन्वये मान्यता दिलेली होती.

तथापि जेलरोडवरील अतिक्रमणधारकांचे लक्ष्मीदेव हॉस्टेल या शासकीय जागेवर पुर्नवसन होण्याबाबत शासनस्तरावर निर्णय झालेला आहे.त्यामुळे संबंधित अतिक्रमणधारकांसाठी संपादन सुरु असलेल्या मौजे देवपूर येथे स.नं. ३५ पैकी आरक्षण क्र.२६ मार्केट या जागेची आवश्यकता राहिलेली नाही. तसेच सन 2013 साली झालेला निवाडा रक्कम रु.२,५५,७०,१००/-व त्यावरील 10 वर्षासाठीचे व्याज यांचा विचार केला यापेक्षा जास्त रक्कम अदा करावी लागेल .त्यामुळे सन 2023-24 चे अंदाजपत्रकातील भुसंपादनासाठी तरतुद विचारात घेता अर्जदार यांनी मागणी केलेला मोबदला (रु.40 कोटी) यासाठी सुधारीत तरतुद करणे आवश्यक आहे.तसेच एकुण मोबदला यावरील व्याज यांची विनाकारण महानगरपालिकेला आर्थिक झळ सोसावी लागणार असल्याने पुर्वीचा निवाडा रद्द

करून व यापुर्वीचे आरक्षण कायम ठेवून धुळे महानगरपालिकामार्फत सुधारीत भुसंपादन कायदा २०१३ नुसार नव्याने भुसंपादन प्रस्ताव सादर करणेस वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१० चितोड रोड येथील तुळसाबाईचा मळा स.नं. ५२९/१ /अ चे आरक्षणात फेरबदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये अंतिम मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.कनिष्ठ अभियंता मौजे धुळे सं. नं. ५२९ तुळसाबाईचा मळा, धुळे शहर मंजूर विकास आराखडा नुसार आरक्षण क्र. २०५ हौसिंग फॉर अर्बन पुअर क्षेत्र ५.१५ हेक्टर आर आहे. सदर आरक्षण रद्द करण्याचा प्रस्ताव महासभे समोर सादर केला असता मनपा ठराव क्र. ३०३ दि. ०८.११.२०२३ अन्वये मंजूरी देण्यात आली होती. त्या अनुषंगाने स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द केले असता कुठलेही हरकत व सूचना प्राप्त झालेली नाही. त्यामुळे अंतिम ठराव करणेसाठी विषय महासभेपुढे सादर केला आहे.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १० दिनांक २२/०२/२०२४**

धुळे शहर मंजूर विकास योजना आराखड्यात उक्त जागा आरक्षण क्रमांक 205 'Housig for urban poor' या आरक्षणाने बाधित असुन सदर आरक्षणाखाली क्षेत्र ५.१५ हेक्टर आर आहे. सदर जागा ही खाजगी मालकीची असून सदर जागा भूसंपादन करणारी संस्था धुळे महानगरपालिका आहे. सर्वे नंबर 529/1/ अ या जागेचा तहसील कार्यालयाचा उतारा पाहिला असता सदर जागा ही प्रभावती बाबुला शिरसाट व सौ रखमाबाई जगनाथ बडगुजर यांच्या नावे दिसून येते. सदर जागेत नविन बांधकाम करता येतील किंवा मंजूर विकास योजनेतील आरक्षणाबाबत कोणती उचित कारवाई करणे योग्य राहील याबाबत मा. सहसंचालक नगर रचना नाशिक विभाग नाशिक यांना दिनांक 17/1/ 2023 अन्वये मार्गदर्शन मिळण्याबाबत विनंती केली आहे.

मा. नगरचनाकार धुळे मनपा यांनी मा. सहसंचालक नगर रचना धुळे शाखा धुळे यांच्याशी प्रत्यक्ष झालेल्या चर्चेनुसार सर्वे नंबर 529/1/अ या जागेवरील आरक्षण क्रमांक 205 - Housing for urban poor' हे आरक्षण रद्द करणे आवश्यक आहे. त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम कलम 37 बाबतची कारवाई करावी लागेल व त्यानंतर सर्वे नंबर 529/1/अ वरील अतिक्रमण नियमाकुल करण्याबाबतची वैधानिक कारवाई करता येईल असा अभिप्राय दिला आहे.

सदरचा विषय धोरणात्मक निर्णयासाठी MRTP 1966 च्या कलम 37 नुसार minor modification चा प्रस्ताव शासनाकडे पाठविणे कामी Planning Authority म्हणून मे. महासभेपुढे ठराव क्र. 303 दि. 08/11/2023 अन्वये स्थानिक वृत्तपत्रात हरकती व सूचना मागविण्यात आलेला आहे.

त्यानुसार दि. 03/01/24 रोजी वृत्तपत्रात व मा. व्यवस्थापक येरवडा शासकीय मुद्रणालय पुणे यांना इकडील कार्यालयीन पत्र क्र. 464 दि. 05/12/2023 अन्वये सदर नोटीस प्रसिध्द केली आहे. तथापि सदर नोटीसीवर हरकती व सूचना मागविणेबाबत मुदत संपलेली असून अद्याप कुठलीही हरकत इकडील कार्यालयास प्राप्त झालेली नाही. त्याअनुषंगाने सदर प्रस्ताव अंतिम मंजुरीस मे. महासभेपुढे नगररचना विभागामार्फत सादर झालेला आहे.

चितोड रोड येथील तुळसाबाईचा मळा स.नं. ५२९/१ /अ चे आरक्षणात फेरबदल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये व वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार अंतिम मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर प्रस्ताव तात्काळ शासनाकडेस अंतिम मान्यतेसाठी सादर करावा.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-११ — धुळे शहर मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड फायनल प्लॉट नं.१५३ या आरक्षित जागेवर व्यापारी संकुल विकसित करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सहा. अभियंता — धुळे शहर मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड क्र. १५३ या ठिकाणी बिओटी तत्वावर व्यापारी संकुल विकसित करणे कामी ३ वेळा निविदा काढून कोणीच निविदा न भरल्याने सदरचे काम बिओटी तत्वावर करणे किंवा मनपाने करणे असे पर्याय ठेवले आहे.

मा.प्रशासक — काय करणे योग्य राहिल ?

म. शहर अभियंता — यासाठी बिओटी वर व्यापारी संकुल उभारणे कामी ई निविदा काढली कोणीही निविदा धारकाने त्याचे देकार, रक्कम पाहून निविदा भरली नाही. आपल्या ठरावात ते नमूद केले नाही की यापेक्षा कमी रक्कमेची निविदा भरु नये. त्यासाठी अल्प मुदतीची निविदा प्रसिध्द करणे साठी मंजूरी मिळावी. आणि दुसरे याकामासाठी जो निधी उभारायचा आहे. त्यासाठी कर्ज घ्यावे लागेल. तर कर्ज घेण्याबाबत मुभा असावी असे ठरावात नमूद करणे आवश्यक आहे.

मा.प्रशासक — आपला जो ठराव होता या संदर्भात झालेला तो ठरावात काय नमूद आहे ते बघा. त्याची जी कॉस्ट आहे ६५ कोटीच्या खाली येणार नाही याची दक्षता घ्यावी असे ठरावात नमूद आहे आपण ३ वेळा निविदा करुन त्याला प्रतिसाद मिळालेला नाही मग पुढचा पर्याय होता मनपाने स्वत: डेव्हलप करावे. त्यामुळे मनपा मार्फत डेव्हलप करतांना काय पर्याय राहतील त्यावर पण नमूद करावे लागेल ठरावामध्ये ऑन स्पॉट ऑक्शन करुन करायचे किंवा ती जागा मॉरगेज करुन त्यावर काही मिळेल बँकेकडून त्यातून १ला मजला पर्यंतचे काम करुन लिलाव करुन ती रककम पुन्हा बँकेत भरुन पुन्हा जावे अशा स्वरुपाचे २-३ पर्याय ठेऊन आपल्याला यामध्ये काम करावे लागेल. तर हे २-३ पर्याय ठराव नमूद करुन ठराव करा आणि त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी. आता ठराव करतांना जो मागील ठराव झालेला आहे. त्यामध्ये सर्व पर्याय आहेत. त्याचा हया ठरावात उल्लेख करा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक ११ दिनांक २२/०२/२०२४**

धुळे शहर मंजूर विकास योजनेतील आरक्षित भूखंड फायनल प्लॉट नं. 153 या आरक्षित जागेवर खाजगी करणातून बी.ओ.टी. तत्वावर व्यापारी संकुल विकसित करणे

कामी आर्कीटेक्ट नेमणूक निहित प्रक्रियेव्दारे करण्यात येवून मे.देवरे धामणे , आर्कीटेक्ट यांना नियुक्त करण्यात आलेले होते.

यापुर्वी निश्चित झालेल्या अधिमूल्य 110.85 कोटी रक्कम मात्र नुसार ई निविदा प्रसिध्द करण्यात आली. परंतू सदर निविदेत कोणीही सहभाग घेतलेला नाही.

त्यानुसार नियुक्त आर्कीटेक यांनी निश्चित केलेल्या सुधारित अधिमूल्य रू.62.90 कोटी मात्रनिश्चित करण्यात येवून त्यास मनपा महासभा ठराव नं. 322 दि.05/12/2023 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर ठरावान्वये निर्धारित केलेली प्रिमीयम रक्कम कमी होणार नाही व सदर व्यापारी संकूल विकसनासाठी मनपाचे आर्थिक हित लक्षात घेवून शासनाच्या वेगवेगळया योजना, शासन निधी किंवा मनपातर्फे ऑन स्पॉट गाळयांचे लिलाव करून निधीची उपलब्ध करून घेणेस किंवा व्यापारी संकूलांचे विकसन करण्यास B.O.T, B.OL.T., B.O.O.T., किंवा P.P.P.O. माध्यमातून प्रकल्प विकसित करणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार प्रिमिअमचे रक्कम रु.62.90 कोटी मात्रची निविदा काढण्यात आली. परंतु सदर निविदेत देखील कोणीही सहभाग घेतलेला नाही. तद्द नंतर पुन्हा प्रिमिअमचे रक्कम रु.62.90 कोटी मात्रची फेर निविदा काढण्यात आली. सदर निविदेत देखील कोणीही सहभाग घेतलेला नाही.

उक्त बाबत 03 वेळेस निविदा मागवून सुद्धा यात कोणत्याही निविदा धारकाने सहभाग घेतलेला नाही. सदरचे काम करणे धुळे शहरासाठी आवश्यक असल्याने सदरचे काम पुन्हा BOT तत्वावर काढणे किंवा मनपाने करणे या बाबतचा निर्णय होणे आवश्यक आहे. त्या करीता सदरचा विषय मे.महासभेपुढे शहर अभियंता यांच्यामार्फत सादर झालेला आहे.

धुळे शहर मंजूर विकास योजेनेतील आरक्षित भूखंड फायनल प्लॉट नं.१५३ या आरक्षित जागेवर व्यापारी संकुल मनपामार्फत विकसित करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर व्यापारी संकूल विकसन करण्यासाठी शासनाच्या वेगवेगळया योजना, शासन निधी किंवा कर्ज उभारणी करून तथा मनपातर्फे ऑन स्पॉट गाळयांचे लिलाव करून निधीची उपलब्ध करून घेणेस वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे. सदर काम उत्पन्नवाढीच्या दृष्टीने आवश्यक असल्याने याकामी अल्पमुदतीची निविदा प्रक्रिया करणेत यावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१२ — जिल्हा नगरोत्थान योजना सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्र. ०६ मधील नवनाथ हॉटेल ते नकाणे तलाव कडे जाणाऱ्या रस्त्या पावेतो Bituminious Concrete रोड करणेचे कामाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडेस सादर करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शहर अभियंता — सदरचा रस्ता हा मुख्य रस्ता असून जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत मा. पालकमंत्री यांनी याची शिफारस केली असल्याने सदरचा प्रस्ताव सभेपुढे ठरावाच्या अनुषंगाने मंजूरीसाठी ठेवला आहे. जे माजी सदस्य होते. प्रत्येक सदस्याला 20-20 लक्ष रुपयाची तरतूद करुन सर्व कामे आपण मंजूरीसाठी मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडे पाठवली होती. पण नजरचुकीने प्र. क्र. १ मध्ये श्री नरेंद्र चौधरी यांची 2 कामे होती संबंधीत अभियंत्यानी पाठवून ठरावात राहून

गेली होती व प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर हे निर्दशनास आले आहे. ती 2 कामे सुध्दा यापुढे मंजूर करावी. असे या ठरावात पाठवले तर संबंधीतांना न्याय मिळेल. कालच मा. नगरसेवक याबाबत तक्रार घेऊन आले होते. ती दोन कामांची या सोबत तरतूद करावी अशी विनंती करतो.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १२ दिनांक २२/०२/२०२४**

शासनाने जिल्हा नगरोत्थान योजने अंतर्गत प्रस्तावित करावयाचे कामा बाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहे. उक्त अनुषंगाने सन २०२३-२४ मधील जिल्हास्तरीय नगरोत्थान योजने अंतर्गत खालील रकान्यातील कामास मंजुरी मिळणे बाबत विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ०६ मधील नवनाथ हॉटेल ते नकाणे तलाव कडे जाणाऱ्या रस्त्या पावेतो Bituminious Concrete रोड करणे बाबत. | ७९,९९,३२३/- |

उक्त बाबत वरील रकान्यातील कामातील अंदाजपत्रकीय खर्चास रु.७९,९९,३२३/- मात्रला सन २०२३-२४ मधील नगरोत्थान योजने अंतर्गत आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे कामी म.जिल्हाधिकारी, धुळे यांच्या कडे पाठविणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच यापुर्वी जिल्हास्तरीय नगरोत्थान योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता व त्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तथापी सदर प्रस्तावात प्र.क्र.१ मधील अत्यावश्यक कामांचा समावेश झालेला नाही. तसेच काही कामे करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर कामे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | प्र.क्र.१ मधील ओमनगर भागात श्री.धनराज पाटील यांच्या घरापासून ते श्री.सैदाणे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | रू.९,९७,२५४/- |
| २. | प्र.क्र.१ मधील ज्ञानदिप कॉलनी भागात श्री.अभय खैरनार यांच्या घरापासून ते श्री.दिलीप बोरसे यांच्या घरापावेतो रस्ता कॉक्रीट करणे. | रू.९,९९,८५४/- |
| ३. | प्र.क्र.१० मध्ये पांडूरंग निंबा घर ते गावा दरवाज्यापावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रू.५०,००,०००/- |
| ४. | श्रीराम नगर भागात मराठेताई यांच्या घरापासून ते किराणा दुकानापावेतो बंदिस्त गटार व कॉक्रीट रस्ता करणे. | रू.४५,००,०००/- |

त्यासाठी मंजूर नियतव्यया व्यतिरिक्त पुर्नविनियोजन (अतिरिक्त) करून निधी उपलब्धतेसाठी प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव मा.जिल्हाधिकारी धुळे यांच्याकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे. उक्त कामांसाठी मनपाचा आवश्यक तो हिस्सा अदा करणेस वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१३ जिल्हा नगरोत्थान योजना सन २०२३-२४ अंतर्गत महानुभाव पंथाच्या दफन भूमीसाठी शासनाने दिलेल्या जागेला संपूर्ण वॉल कंपाऊंड करणे व अंतर्गत व्यवस्था करणेबाबतचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडेस सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शहर अभियंता यासाठी तरतूद नाही. आपल्याकउे जी तरतूद होती जे मंजूर निधीतून होते व आपले मागचे दायित्व वजा करुन जेवढी तरतूद होती तेवढी सर्व संपली आहे. या आर्थिक वर्षामध्ये इतर विभागाचे पैसे वाचले आहे. त्यातून किरकोळ स्वरुपात मिळणे अपेक्षित आहे. समजा या वर्षात नाही झाले तर पुढील आर्थिक वर्षात सदरचे काम प्रस्तावित करुन महानुभव पंथासाठी शासनाने जागाही उपलब्ध करुन दिली आहे. वॉल कंपाउंड करणे यासाठी लोकांनी वेळोवेळी मागणी होती. आमदार, खासदार यांच्याकडे पाठपुरावा केला आहे. तर हे करणे आवश्यक असल्याने प्रस्ताव महासभेपुढे सादर.

मा.प्रशासक सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता देवून प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १३ दिनांक २२/०२/२०२४**

महानुभाव पंथाच्या दफन भूमीसाठी शासनाने दिलेल्या जागेला संपूर्ण वॉल कंपाऊंड करणे, अंतर्गत रस्ता, बैठक व्यवस्था, शेड, पाण्याची टाकी व पेव्हर ब्लॉक बसविणे या कामास अंदाजित खर्च रक्कम रु.२,००,००,०००/- अपेक्षित असून कामाचा महाराष्ट्र सुवर्ण जंयती नगरोत्थान (जिल्हास्तर) अंतर्गत स्मशानभूमी विकसित करणे अंतर्गत प्रस्ताव सादर करणेपुर्वी मे.महासभेचा ठराव करणे आवश्यक आहे.

तसेच या कामाबाबत नगररचना विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिला आहे.

मौजे देवपूर सर्व्हे नं.१०३/2/अ व १०३/2/ब हि जागा ७/१२ उताऱ्यानुसार ०.८० हे आर हि महानुभाव पंथाच्या दफनभूमीसाठी राखीव क्षेत्र म्हणून नोंद केलेली आहे. तसेच धुळे शहर मंजूर विकास योजनेत औद्योगिक क्षेत्रात तसेच विकास योजना रस्ता १५.०० मी., प्ले ग्राउंड , भाजीपाला मार्केट ,असे आरक्षणाने बाधित होत असून सदर ०.८० हे आर या वितरीत करण्यात आलेल्या क्षेत्रास उक्त आरक्षण विचारात घेवून संरक्षण भिंतीचे काम करणेस हरकत नाही. असा प्रस्ताव बांधकाम विभागामार्फत सादर करण्यात आलेला आहे.

उक्त बाबत वरील रकान्यातील कामातील अंदाजपत्रकीय खर्च रु.२,००,००,०००/- मात्रला मंजूर नियतव्यया व्यतिरिक्त पुर्नविनियोजन (अतिरिक्त) करून निधी उपलब्धतेसाठी प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव मा.जिल्हाधिकारी धुळे यांच्याकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच मनपाचा आवश्यक तो हिस्सा अदा करणेस वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१४ अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास योजना सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्रमांक ०६,०१,१८,१५,०७, ०२ मध्ये विद्युत विषयक सोलर हायमास्ट बसविणे कामाचा

प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडेस सादर करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शाखा अभियंता — मा. जिल्हाधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे हा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवला आहे मंजूरीसाठी मा. पालकमंत्र्यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार मंजूरीसाठी महासभेपुढे सादर केलेला आहे.

मा.प्रशासक — सदर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १४ दिनांक २२/०२/२०२४**

शासन निर्णयात नमूद निकषानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत एकूण ५५ कामांची निश्चिती करून संदर्भ क्र.१ ठराव व २ नुसार पूरक ठराव पारित करण्यात आलेला होता. नुसार धुळे महानगरपालिका पत्र क्र./धुमपा/बां.वि./१८१/ दि.३१/१०/२०२३ अन्वये ४५ कामांचा एकूण रु.१२,००,००,०००/- मात्र रकमेचा तसेच नव्याने झालेल्या पूरक ठरावानुसार धुळे महानगरपालिका पत्र क्र./धुमपा/बां.वि./११५/ दि.०७/१२/२०२३ अन्वये १० कामांचा एकूण रु.३,६०,००,०००/- मात्र रकमेचा असा एकूण १५,६०,००,०००/- मात्र रकमेचा प्रस्ताव म.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे. त्यात प्राधान्य क्रमाने कामे घेणेबाबत निश्चिती नमूद आहे.

उक्त कामी रु.१५.६० कोटी मात्र रकमेचा प्रस्ताव सादर केला असला तरी दीड पट रक्कमेसह मंजूर नियतव्यय नुसार रक्कम रु.८.६५ कोटी मात्र रकमेपर्यंत प्रशासकीय मान्यता मिळण्यास वाव आहे. यामध्ये मा.पालकमंत्री महोदय यांच्या राखीव निधीची कामे मे प्राधान्याने घेणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे दि.२०/०१/२०२४ रोजी जिल्हा नियोजन आढावा बैठकीत मा.जिल्हाधिकारी यांनी प्रशासक म्हणून आपण रु.८.६५ कोटी मात्र रकमेची कामांची निश्चिती करून द्यावी असे निर्देश दिले होते. आढावा बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार रु ८.६५ कोटी मात्र रकमेच्या कामांची निश्चिती फेर ठराव क्र ३ नुसार १ ते ३० कामांना मान्यता देण्यात आली ,त्यानुसार १ ते ३० कामांच्या प्रस्तावाच्या प्रती तांत्रिक मंजुरीसह आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी म.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे.

मा.पालकमंत्री महोदय यांचे स्वीय सहाय्यक यांच्या निर्देश नुसार शहरातील अनुसूचित जाती व नवबौद्ध यांचेसाठी आरंभित प्रभाग तसेच अनुसूचित जाती व नवबौद्ध नागरीकांचे प्रमाण असलेले **प्रभाग क्र ६,१,१८,१५,०७,०२ मध्ये विद्युत विषयक सोलर हायमास्ट बसविणे रु.५० लक्ष** कामाची निश्चिती प्रशासक म्हणून करून द्यावी असे निर्देश दिले आहे.त्यानुसार प्रस्ताव शाखा अभियंता यांनी सादर केलेला आहे.

उक्त प्रस्तावानुसार सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्रमांक ०६,०१,१८,१५,०७, ०२ मध्ये विद्युत विषयक सोलर हायमास्ट बसविणेकामी मंजूर नियतव्यया व्यतिरिक्त पुर्नविनियोजन (अतिरिक्त) करून निधी उपलब्धतेसाठी प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव मा.जिल्हाधिकारी धुळे यांच्याकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच खालील अत्यावश्यक कामे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास योजना सन २०२३-२४ अंतर्गत प्रस्तावित करण्यात येत आहे.

१. प्र.क्र.१० मध्ये गायकवाड चौक उत्तरेस ग.नं.१४ मेहत्तर समाज सफाई कामगार वसाहतपावेतो रस्ता कॉक्रीटीकरण करणे. अंदाजित रक्कम रू.५० लक्ष

सदर काम मंजूर नियतव्यया व्यतिरिक्त पुर्नविनियोजन (अतिरिक्त) करून निधी उपलब्धतेसाठी प्रशासकीय मान्यता मिळणेस्तव मा.जिल्हाधिकारी धुळे यांच्याकडेस प्रस्ताव

सादर करणेस वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१५ ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार कार्यक्रम योजने अंतर्गत सन २०२३-२४ अंतर्गत कामांची निश्‍चित करून प्रस्ताव म.जिल्हाधिकारी यांच्याकडेस सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.शहर अभियंता याबाबत शहराचे आमदारांनी प्रस्ताव शासनाकडे दिला होता. कामांची निश्‍चीती करुन पत्र पाठवले आहे. ठराव त्यासाठी आवश्यक असल्याने विषय महासभेपुढे सादर.

मा.प्रशासक ही कामे घेतली ती त्या भागातील आहे ना याची खात्री करुन घ्या.

म.शहर अभियंता हो खात्री केली आहे. आणि संबंधीत जो विभाग आहे समाजकल्याण विभाग ते सुध्दा त्यांच्या स्तरावर खात्री करुन देतात. तसे आपण ठरावात नमूद करु.

मा.प्रशासक सदर प्रस्ताव मा.आयुक्त प्रकल्प अधिकारी,आदिवासी प्रकल्प विभाग यांच्याकडेस सादर करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १५ दिनांक २२/०२/२०२४**

शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र.ठबायो.२०२३/प्र.क्र.१६५/का.९ दि.०३ जानेवारी २०२३ रोजीच्या निर्णयानुसार व निकषानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी धुळे मनपा हद्दीतील ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार कार्यक्रम योजने अंतर्गत एकूण ६ कामांची निश्‍चिती करून सदर कामांबाबत शासन निर्णय प्राप्त आहे त्यानुसार ६ कामांचा एकूण रु.१,८९,८०,३१८/- मात्र रकमेचा प्रस्ताव म.जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करावयाचा असल्याने सदर कामांना मे.महासभेची मंजुरी आवश्यक असल्याने तसा प्रस्ताव बांधकाम विभागामार्फत सादर झालेला आहे. यात खालील कामांचा समावेश आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे नाव** | **अंदाजपत्रकीय रक्कम** |
|---|---|---|
| **१.** | धुळे मनपा हद्दीतील पिंप्री भागातील आदिवासी वस्तीतील अन्वर नाला लगत असलेला रस्ता कॉक्रीट करणे. | रू.२९,९७,१६३/-- |
| **२.** | धुळे मनपा हद्दीतील पिंप्री भागातील आदिवासी वस्तीतील अन्वर नाला लगत कॉक्रीट गटार करणे. | रू.१९,९८,०७७/- |
| **३.** | धुळे मनपा हद्दीतील जय मल्हार नगर बिलाडी रोड भागातील आदिवासी वस्तीतील रस्ता कॉक्रीट करणे. | रू.४९,९९,८७३/- |
| **४.** | धुळे मनपा हद्दीतील जय मल्हार नगर बिलाडी रोड भागातील आदिवासी वस्तीतील कॉक्रीट गटार करणे. | रू.१९,९८,०७७/- |
| **५.** | धुळे मनपा हद्दीतील जमनागिरी भागातील आदिवासी वस्तीतील कॉक्रीट गटार करणे. | रू.१४,९५,५८२/- |
| **६.** | धुळे मनपा हद्दीतील जमनागिरी भागातील आदिवासी वस्तीतील रस्ता कॉक्रीट करणे. | रू.५४,९१,५४६/- |

उक्त कामे सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी धुळे मनपा हद्दीतील ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार कार्यक्रम योजने अंतर्गत मा.आयुक्त प्रकल्प अधिकारी,आदिवासी

प्रकल्प विभाग यांच्याकडेस प्रस्ताव सादर करणेस वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

तसेच सदर कामे शासन निर्देशानुसार त्यांच्या भागात व वस्तीत प्रस्तावित होतील याबाबत बांधकाम विभागाने खात्री करावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१६ | धुळे महानगरपालिकेत ई.गव्हार्नन्स अंमलबजावणीसाठी ERP SOFTWARE MODULES तसेच DATA UNIFICATION संगणकीय प्रणाली कार्यान्वियत करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| मा.प्रशासक | याला पैसे कोण देणार आहेत? |
| म.सिस्टीम मॅ. | आपल्याला खर्च करावा लागणार आहे. यामध्ये ज्यांचे माईल्सस्टोन कमी होतील त्यांना पैसे देण्यात येणार आहे. |
| मा.प्रशासक | हे सर्व करुन घ्या आणि याला लागणारी अमाउंट मागायची आहे. काय काय कामाचा अंतर्भाव आहे यात? |
| म. सिस्टीम मॅ. | राज्य शासनाने व केंद्र शासन विविध संगणीय प्रणालींशी सलग्नीकरण व एकूण 73 सेवा यात पुरवण्यात येणार आहे. |
| मा.प्रशासक | तयार करुन द्या. येणाऱ्या खर्चाचे प्रपोजल पण डीएमए ला देऊन टाका.सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. |

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १६ दिनांक २२/०२/२०२४**

धुळे महानगरपालिकेत शासनाच्या ई-गव्हार्नन्स धोरणाची अंमलबजावणी करणेसाठी तसेच EASE OF DOING BUSINESS आणि RIGHT TO SERVICES अंतर्गत LAND & ESTATE,DMA DASH BOARD,LEGAL CASE MANAGEMENT,WORKS MANAGEMENT,FILE MANAGEMENT SYSTEM, PENSION MANAGEMENT,HR & PAYROLL MANAGEMENT,SOLID WASTE MANAGEMENT,TREE CENSUS(MOBILE APP),ASSET MANAGEMENT, MUNICIPAL SECRETARY, PERFORMANCE ASSESSMENT,SOCIAL WELFARE, INVENTORY MANAGEMENT,BOMBAY NUSRING ACT,WEB BASED PORTAL उपरोक्त मोड्यूल्स ची आवश्यकता असल्याने ASCENTECH INFORMATION TECHNOLOGY PRIVATE LIMITED यांनी COMMERCIAL प्रस्ताव सादर केलेले असून त्यात दोन वर्षाच्या SOFTWARE UPGRATION, देखभाल,मोड्यूल अंमलबजावणी,प्रशिक्षणसह सादर केलेली आहे.

तसेच शासनाच्या MILESTONE 1 अंतर्गत मालमता कर विभाग व राज्य व केंद्र शासनाच्या विविध संगणकीय प्रणालींशी सल्नीकरण,नोंदणी व मुद्रांक विभाग महाराष्ट्र शासनाच्या iSarita प्रणालीशी सल्नीकरण,राज्यस्तरीय इतर सेवा पुरविणाऱ्या MSEB

संस्थेशी संल्नीकरण,आपले सरकार NUDM सल्नीकरण,मैत्री पोर्टल संल्नीकरण,मनपाच्या इतर विभागच्या संगणक प्रणालींशी सल्नीकरण करणे आवश्यक ASCENTECH INFORMATION TECHNOLOGY PRIVATE LIMITED यांनी COMMERCIAL प्रस्ताव सादर केलेले असून त्यात दोन वर्षाच्या SOFTWARE UPGRATION, देखभाल,मोड्यूल अंमलबजावणी,प्रशिक्षणसह सादर आहे. सदरचे मोड्यूल्स (संगणकीय प्रणाली ) शासनाचा GeM पोर्टलवरून निविदा (BID) पद्धतीने ई-गव्हार्नन्स या लेखशीर्षा अंतर्गत तसेच Milestone1 निविदा या लेखाशीर्षा अंतर्गत सदर बाबतची निविदा शासनाचा GeM पोर्टलवरून प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.यासाठी सदर प्रस्ताव मे.महासभेपुढे निर्णयास्तव सादर झालेला आहे.

धुळे महानगरपालिकेत ई.गव्हार्नन्स अंमलबजावणीसाठी ERP SOFTWARE MODULES तसेच DATA UNIFICATION संगणकीय प्रणाली शासनाच्या नियमानुसार कार्यान्वित करणेसाठी निविदा प्रक्रिया करणेस वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे. तसेच DATA UNIFICATION संगणकीय प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी अनुदान उपलब्धतेची मागणी शासनाकडेस तथा सक्षम प्राधिकरणाकडे करण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१७ — धुळे महानगरपालिकेतील सर्व अभिलेखे स्कॅन करून संगणकीकृत करणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म.सिस्टीम मॅ. — आतापर्यंत धुळे मनपा अस्तित्वात आल्यापासून आज पावेतो कागदपत्र वर्गीकरण आणि स्कॅनिंगचे कामकाज झालेले नाही. मागील आग लागणे , गहाळ होणे यासारखे प्रकार लक्षात घेता हे करणे आवश्यक आहे. जेवढे विभाग आहे त्यांचे जेवढे पण रेकॉर्ड आहे ते माहिती अधिकारात मागीतले जातात व शासनाकडे सादर करावयाचे असल्याने सर्व डॉक्युमेंट डिजीटल सॉफ्टवेअरमध्ये टाकणे आवश्यक असल्याने हा विषय मंजूर करण्यात यावा. ही विनंती.

मा.प्रशासक — डीएमए ने जे मॉडेल टेंडर डॉक्युमेंट बनवले आहे. ते रिफर करा. याकरीता पर पेज स्कॅनिंग रेट काय असेल त्याचे रेट मागवून घ्या. ते सोईचे पडेल. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १७ दिनांक २२/०२/२०२४**

महाराष्ट्र शासन सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ व महाराष्ट्र शासन अभिलेख नियम २००७ अन्वये नागरिकांना माहितीचा अधिकार मिळणे सोयीचे होईल यासाठी आणि योग्य स्वरूपात व वाजवी कालावधीत धुळे महानगरपालिकेतील सर्व अभिलेख योग्य रितीने सुचीबद्ध संगणकीकरण करणे आवश्यक आहे.

धुळे महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासून आज पावेतो कागदपत्र वर्गीकरण आणि स्कॅनिंगचे कामकाज झालेले नाही.सुरुवातीपासून ते आजपर्यंतचे अभिलेखे मोठ्याप्रमाणात उपलब्ध आहेत.ते वर्गीकरण आणि स्कॅनिंग करणे आवश्यक आहे.नागरिक वेगवेगळया आकारातील अनेक अभिलेखे,विविध प्रकारचे नकाशे विविध विषयांचे ठराव व

इतर महत्वाचे कागदपत्रे नागरिक माहितीच्या अधिकारात मागत असतात.कित्येक कागदपत्रांचे त्यांच्या आकारमानामुळे व झेरॉक्स/पुर्नकॉपी: करणेशक्य नसते.त्याचबरोबर कार्यालयाला विविध कामांसाठी जुने अभिलेख आवश्यक असतात.अशावेळी अभिलेख कक्ष सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बौद्धिक कौशल्यावर अवलंबून राहून आवश्यक असणारे अभिलेख मिळवावे लागतात.वेळोवेळी अपुऱ्या कर्मचाऱ्यांच्या आभावी व बदलणाऱ्या कर्मचाऱ्यांनाजुन्या अभिलेखांची माहिती नसते. त्यामुळे कामकाजास अडथळा निर्माण होत आहे.या कारणाने कार्यालयात अभिलेख उपलब्ध असून सुद्धा वेळेवर कार्यालयाला व नागरिकांना माहिति उपलब्ध होऊ शकत नाही.तसेच काहीवेळा कागदपत्र गहाळही होतात व काही अनपेक्षित अपघाताने कागदपत्रांचे नुकसान होऊ शकते,अभिलेख कक्षासाठी मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध होऊ ण शकल्याने महत्वाची कागदपत्रे वर्गीकरण करून ठेवणे व जतन करणे शक्य होऊ न शकल्याने महत्वाची कागदपत्रे वर्गीकरण करून ठेवणे व जतन करणे शक्य होत नाही.यामुळे सध्याच्या काळात आपल्या सर्व अभिलेखांचे शासकीय नियमानुसार ‘अ’ ‘ब’ ‘क’ ‘क१’ ‘ड’ या पद्धतीने वर्गीकरण करून अभिलेख कक्ष अद्यावत करणे व महत्वाच्या कागदपत्रांचे स्कॅनिंग-डिझीटायझेशन करून त्यांच्या पप्रतिमांचे क्रॉपिंग,क्लिनिंग करून ती संगणकीकृत करून सुरक्षित करणे ही काळाची गरज आहे.

प्रस्तृत कामकाज उपलब्ध असलेल्या अभिलेख मनपाकडे अस्तित्वात असलेल्या वर्षा पासून आजपर्यंत कार्यान्वित करणेकामी महानगरपालिका कामाच्या कागदपत्रांची वर्गीकरणची माहिती असणाऱ्या व विविध आकारातील कागदपत्रांचे आधुनिक स्कॅनरद्वारे स्कॅनिंगचे कामकाज अनुभवी कंपनीकडून दरपत्रके मागविण्याची कार्यवाही करणे आवश्यक असल्याने अभिलेखे स्कॅन करून संगणकीकृत मोड्यूल्स (संगणकीय प्रणाली ) ई-गव्हार्नन्स या लेखशीर्षा अंतर्गत सदर बाबतची निविदा शासनाचा ई-निविदा (MAHA TENDER) पोर्टलवरून प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.यासाठी सदर प्रस्ताव मे.महासभेपुढे सादर झालेला आहे.

धुळे महानगरपालिकेतील सर्व अभिलेखे स्कॅन करून संगणकीकृत करणेकामी शासनाच्या निर्देशानुसार निविदा प्रक्रिया करणेस वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.तसेच याकामी रक्कम निश्चिती करतांना प्रति पान रक्कम निश्चित करून पुढील निविदा प्रक्रिया करावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांक:-१८ | देवपूर भागातील गट नं.४६ वन जमिनीवरून धान्य गोदामापासून ते बिलाडी रोडपावेतो रस्ता खडीकरण करणे व पाईपमोरी बांधणेकामी वन विभागाची जागा उपलब्ध करून देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे. |
| म.नगरसचिव | नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले. |
| म.सहा.अभियंता | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. |
| म.अति.आयुक्त | सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. |

मा.प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रस्ताव तातडीने वनविभागाकडेस सादर करण्यात यावा.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १८ दिनांक २२/०२/२०२४**

देवपूर भागांतील धान्य गोदामापासून ते बिलाडी रोड पावेतो रस्ता खडीकरण करणे व पाईपमोरी बांधणे रक्कम रु.१,६१,५९,५१२/- मात्र कामाचा कार्यादेश ठेकेदार मे.हिंद कन्सट्रक्शन, धुळे यांना देण्यात आला आहे.सदर कामाची मुदत सुमारे ४ महिने आहे.त्यानुषंगाने मौजे देवपूर येथील स.नं. ४६ मधील जागा हि धुळे शहर मंजूर विकास योजनेनुसार व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ अन्वये ३ जुलै २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार धुळे शहराची विकास योजना लागू असून त्यात ३०.०० मी. वि.यो. रस्ता दर्शविला आहे.

सदरचा रस्ता वन विभागाच्या हद्दीत असल्याने सदरचे विभागाने काम बंद केले आहे.उक्त बाबत सदर रस्त्याचे काम लोकसभा निवडणुकी पूर्वी तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच सदरचा रस्ता गट नंबर ४६ वन विभागाच्या जागेतून लांबी ९५० मी व रुंदी १०.०० मी असे एकूण ९,५०० चौ.मी म्हणजेच ०.९५ हे. वनजमीन क्षेत्र आवश्यक असल्याने वन विभागाची परवानगी घेणेकामी मे.महासभेचा ठराव आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मे.महासभेपुढे शहर अभियंता यांच्यामार्फत सादर झालेला आहे.

देवपूर भागातील गट नं.४६ वन जमिनीवरून धान्य गोदामापासून ते बिलाडी रोडपावेतो रस्ता खडीकरण करणे व पाईपमोरी बांधणेकामी गट नंबर ४६ वन विभागाच्या जागेतून लांबी ९५० मी व रुंदी १०.०० मी असे एकूण ९,५०० चौ.मी म्हणजेच ०.९५ हे.वनजमीन क्षेत्र जागा उपलब्ध करून देणेकामी वनविभागाकडेस प्रस्ताव सादर करण्यास वाचा क्र.१ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**धुळे महानगरपालिका,धुळे**